प्रास्ताविक --

पद्मभूषण डॉ.जे.पी.नाईक यांचे कार्य अष्टपैलू आहे.ते एक थोर विचारवंत,आंतरराष्ट्रीय किर्तिचे शिक्षण तज्ज्ञ,भारत सरकारचे माजी शिक्षण सल्लागार होते. जे.पी.नाईक यांच्याच पुढाकाराने प्रयत्नाने इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन ,पुणे व विद्याभारती यासारख्या शिक्षण क्षेत्रात काम करणा-या संस्था स्थापन झाल्या.कोल्हापूर संस्थानात रिजन्सी कौन्सिलचा यशस्वी कारभार,सुधारणा,योजना आखण्यात जे.पी.नाईक यांच्याच सिंहाचा वाटा आहे.एखादी जबाबदारी स्विकारली की तन मन धन यांच्या सहाय्याने जे.पी.नाईक त्या कामासाठी रात्रंदिवस झटत.सुरु केलेले काम संपेपर्यन्त त्यांना चैन नसे.कोल्हापूर संस्थानात १९४०-४९ या काळात त्याचे प्रशासक,शिक्षण सल्लागार विकास सचिव यादृष्टीने केलेले काम अजोड आहे.

बालपणातील काबाड-कष्ट ,गरीबीची परिस्थिती ,ग्रामीण भागात येणा-या अडचणी यांचा त्याना कधीच विसर पडला नाही.अनेक योजना आखताना उच्चस्तरीय लोकांच्या सुविधेपेक्षा तळागाळाच्या लोकांच्या जीवनातील प्रश्न सोडविणे.ग्रामीण विकास करणे त्याच्या हे जीवनाचे ध्येय होते.

जे.पी.नाईक हे स्वातंत्र्य सैनिक,कुशल संघटक, कुशल प्रशासक आदर्श शिक्षक आणि राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय किर्तिचे थोर शिक्षणतज्ज्ञ होते. त्याचे शैक्षणिक समस्या,व शिक्षण क्षेत्रातील कार्य फारच मोलाचे आहे. तरीही कोल्हापूर मधील त्याच्या कार्याचा वेगळा पैलू दृष्टिस आल्याने जे.पी. नाईक यांच्या कोल्हापूरमधील कार्याची अभ्यास करण्याचा मी या ठिकाणी प्रयत्न करीत आहे. सदरचा अभ्यास करताना सर्व उपलब्ध मूळ कागदपत्रांचा अभ्यास करुन जे.पी.नाईक यांचे कोल्हापूरमधील कार्य किती मोठे आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील जे.पी.नाईक यांचे कार्य केले आहे. संस्थेतून संस्था निर्मिती या धोरणाने अनेक संस्था निर्माण करुन आपले नाव जे.पी.नाईक यांनी चिरस्मरणीय केले आहे.

या प्रबंधाचे काम करीत असताना अनेक लोकांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले.

माझे या लघु शोध प्रबन्धाचे मार्गदर्शक डॉ.बी.डी.खणे, याचे वेळोवेळी मार्गदर्शन झाले व सर्व प्रकरणे त्यानी वेळेत तपासून दिली म्हणून हा प्रबन्ध विद्यापीठात योग्य वेळी सादर करु शकले.म्हणून मी त्याची शतश: ऋणी आहे.

माझ्या प्राध्यापक मैत्रिणी सौ.एन.आर.सप्रे,प्रा.सौ.एम.एस.जर्दे, प्रा.श्रीमती बेकर यांनी वेळोवेळी मला प्रेरणा दिली .तसेच शिवाजी विद्यापीठाचे बॅ.खर्डेकर ग्रंथालयातील कर्मचारी ,महावीर महाविद्यालय लायब्ररीयन सौ.मर्दे यांचेही सहकार्य मला लाभले त्याची मी आभारी आहे.

या शोध निबंधास प्राचार्य मा.गो.माळी ,प्राचार्य अरविंद सातवेकर, श्रीकरवीरकर यांनी अनेक महत्वाची कागदपत्रे मिळवून देण्यात मोलाचे सहाय्य केले आहे,त्याची मी शतश: ऋणी आहे. तसेच इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे येथील श्रीमती ठाकूर या लायब्ररीयन व एस.एन.डी.टी.कॉलेजचे लायब्ररीयन जोशी यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्याची मी ऋणी आहे.

शिवाजी विद्याठाचे बॅ.खर्डेकर ग्रंथालय,कोल्हापूरचे रेकॉर्ड ऑफिस - इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन,पुणे यांची खूपच मदत झाली त्याचे व कर्मचा-याचे आभार मानने अत्यंत गरजेचे वाटते.

या कामाची पूर्तता त्वरित करावी यासाठी माझे पती श्री ॲड.बी.डी. मकुभाई यांनी मला प्रोत्साहन दिले व वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

श्री.बाळकृष्ण रा.सावंत,कोल्हापूर यांनी वेळेत टंकलेखन करुन दिल्याबद्दल मी त्याची आभारी आहे.

कोल्हापूर | प्रा.सौ.मकुभाई एस.बी.

दिनांक २९-५-१९९२

..